# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 13.10.2026** **वार : मंगळवार**

---

## ठळक बातम्या

1. राष्ट्रपतींकडून 6 राज्यांच्या राज्यपालांची नियुक्ती.
2. नवी दिल्लीत आज बिमस्टेक गृहमंत्र्यांची बैठक.
3. महाराष्ट्रात मतदार यादी सखोल पुनरीक्षण प्रक्रियेला मुदतवाढ, तर पंजाबमध्ये अंतिम मतदार यादी जाहीर.
4. महाराष्ट्र आणि कर्नाटकमधील ऊस उत्पादकांच्या प्रश्नांवर उच्चस्तरीय समिती स्थापन होणार.

## सविस्तर बातम्या

### राज्यपाल नियुक्ती

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल सहा राज्यांच्या राज्यपालांची नियुक्ती केली. केरळ, तामिळनाडू, सिक्कीम ओडिशा, कर्नाटक आणि उत्तराखंड या राज्यांसाठी या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. सिक्कीमचे विद्यमान राज्यपाल ओम प्रकाश आता केरळचे तर केरळचे विद्यमान राज्यपाल राजेंद्र आर्लेकर आता तामिळनाडूचे राज्यपाल असतील. दुष्यंत गौतम सिक्कीमचे, ब्रिज मोहन राम ओडिशाचे, डॉ. सुधा यादव कर्नाटकच्या तर डॉक्टर धल सिंह बिसेन उत्तराखंडचे राज्यपाल म्हणून नियुक्त झाले आहेत.

### बिमस्टेक बैठक

नवी दिल्ली इथं आज बिमस्टेक गृहमंत्र्यांची पहिली बैठक होणार आहे. या बैठकीचं यजमानपद भारत भूषवणार असल्याची माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काल दिली. या बैठकीत दहशतवाद, आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारी, आर्थिक अपहार, तस्करी आणि सायबर धोक्यांबद्दल चर्चा होणार असल्याचं शाह यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. सामायिक सुरक्षा आव्हानांवर तोडगा काढण्यासाठी सहकार्य बळकट करण्यावर या बैठकीत भर देणार असल्याचंही गृहमंत्र्यांनी सांगितलं.

### कॉंग्रेस मोर्चा

एसआयआर प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप करत काँग्रेससह विरोधी पक्षांच्या नेत्यांनी काल सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढला. त्यानंतर लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाला अर्थात एसआयआरला आव्हान देणारी याचिका, सर्वोच्च न्यायालयात दाखल केली.

दरम्यान कॉंग्रेसच्या या मोर्चावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार टीका केली. सत्तेत येण्यासाठी देशात अराजक माजवण्याचा प्रयत्न काँग्रेस करत आहे. तसंच सर्वोच्च न्यायालयावर दबाव आणण्याचा प्रयत्न सुरू आहे असंही ते म्हणाले.

### जंतर मंतर

दिल्लीतील अधिकृत आंदोलनस्थळांच्या यादीतून जंतरमंतर हे ठिकाण वगळण्यात आलं आहे. यापुढे जंतरमंतरवर आंदोलन करता येणार नाही असं दिल्ली पोलीस आयुक्त अनुराग कुमार यांनी जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे. अधिकृत

आंदोलनासाठी आता जंतरमंतरऐवजी 3 नवीन ठिकाणं दिल्ली पोलिसांनी सुचवली आहेत. यामध्ये रामलीला मैदान, बुरारी मैदान आणि पूर्व दिल्लीतील सीबीडी मैदानांचा समावेश आहे

**महाराष्ट्र एसआयआर**

महाराष्ट्रात मतदार यादी सखोल पुनरीक्षण प्रक्रियेतील हरकती आणि दावे नोंदवण्यास 26 ऑक्टोबरपर्यंत पुन्हा मुदतवाढ देण्यात आली आहे. 31 ऑगस्टला मतदार यादी जाहीर करण्यात आली होती. सुधारित वेळापत्रकानुसार, हरकती आणि दावे यांचे निवारण 10 नोव्हेंबरपर्यंत पूर्ण केले जाणार असून, 16 नोव्हेंबरपर्यंत अंतिम यादी जाहीर करण्यात येणार आहे.

**पंजाब**

पंजाबमध्ये मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेनंतरची अंतिम मतदार यादी काल जाहीर करण्यात आली. यापूर्वी ऑगस्टमध्ये प्रकाशित झालेल्या प्रारूप मतदार यादीत जवळपास दीड कोटी मतदार होते, आताच्या यादीच एकंदर मतदारांची संख्या दोन कोटींहून अधिक झाली आहे. यादीत 506 तृतीयपंथी मतदारांचाही समावेश आहे. सर्व पात्र मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केल्याचं पंजाबच्या मुख्य निवडणूक अधिकारी अनिनदिता मित्रा यांनी यावेळी सांगितलं.

**निवडणूक आयोग**

मतदार पुनरीक्षण यादीतून पात्र मतदार वगळला जाऊ नये या उद्देशाने केंद्रीय निवडणूक आयोगानं सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एक विशेष मोहिम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. दिल्लीत येत्या 18 तारखेला सर्व मतदान केंद्रावर ही विशेष शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. तर इतर राज्यांमध्येही अशा प्रकारची शिबिरे आयोजित केली जाणार आहेत.

**साखर समिती**

महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही राज्यांतील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी केंद्र सरकारने उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान तसेच अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांनी काल दिल्लीत दोन्ही राज्यांतील उस उत्पादक शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाशी चर्चा केली. त्यानंतर ही घोषणा करण्यात आली. शेतकऱ्यांना प्रत्यक्षात भेडसावणारी आव्हाने, कारखान्यांकडून नोंदवलेल्या साखर उताऱ्यातील आकडेवारीतील तफावत, वजन प्रक्रिया, अशा विविध मुद्द्यांवर बैठकीत चर्चा झाली. शेतकऱ्यांना त्वरीत दिलासा देण्याच्या हेतूनं एक आठवड्याच्या आत समिती स्थापन करण्याची घोषणा यावेळी करण्यात आली. केंद्र आणि राज्य सरकारांचे प्रतिनिधी, शेतकरी संघटना, साखर कारखान्याचे प्रतिनिधी आणि संबंधित विषय तज्ज्ञ यांचा समितीत समावेश असेल.

**पोलाद धोरण**

केंद्र सरकारने जागतिक स्तरावर स्पर्धात्मक, प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब करणारा आणि पर्यावरणाच्या दृष्टीनं शाश्वत आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर करणाऱ्या पोलाद उद्योग उभारण्यासाठी धोरणात्मक आराखडा तयार केला आहे. जागतिक पोलाद उद्योगात भारताचं स्थान उंचावणं आणि देशाची वाढती पोलादाची गरज पूर्ण करण्याच्या उद्देशानं हा आराखडा तयार करण्यात आला आहे.

**भारत इराण**

भारत आणि इराण यांच्या वरिष्ठ सुरक्षा अधिकाऱ्यांमध्ये नुकतीच चर्चा पार पडली. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी इराणकह राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सचिव मोहसेन रेझाई यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केल्याचं इराणच्या दिल्लीतील दूतावासाने समाज माध्यमांवर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

**ट्रम्प रशिया डिझेल**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाला डिझेल पुरवण्याच्या आपल्या धोरणाचं समर्थन करत माध्यमांच्या टिकेला प्रत्युत्तर दिलं आहे. युरोपीय महासंघाची उर्जा रशियासाठीच खर्च होत असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं. युरोपीय महासंघाने

250 अब्ज अमेरिकी डॉलर्स रशियावर खर्च केले असून माध्यमांनी त्याबद्दल माहिती दिली नाही, असा दावा ट्रम्प यांनी समाज माध्यमावरून केला आहे.

**<u>औषध नफा मर्यादा</u>**

कर्करोगगावरील औषधांच्या नफ्यावर मर्यादा घालून, ती कमाल किरकोळ किमतीच्या 30 टक्क्यांपर्यंत ठेवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती केंद्र सरकारनं सर्वोच्च न्यायालयाला दिली आहे. सर्वच औषधांच्या किमतीचा व्यापक आढावा घेण्याचं आवाहन न्यायमूर्ती विक्रम नाथ यांच्या अध्यक्षतेखाली खंडपीठानं सरकारला केलं आहे. घाऊक विक्रेत्यांसाठीची किंमत आणि औषधांवरची छापील किंमत यात सातत्याने तफावत आढळून आल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने विचारणा केली होती. रुग्णांवर येणाऱ्या आर्थिक ताणाबद्दल न्यायालयाने चिंता व्यक्त केली होती.

**<u>उर्जा सचिव बैठक</u>**

कार्बन बाजारपेठ आणि युरोपियन महासंघाच्या कार्बन बॉर्डर ॲडजस्टमेंट मेकॅनिझम या बाबींमध्ये सहकार्य अधिक दृढ करण्यासंदर्भात काल भारत आणि युरोपियन कमिशन यांनी सहमती दर्शवली. दिल्लीत काल ऊर्जा सचिव पंकज अग्रवाल आणि कर आकारणी आणि सीमा शुल्क संघाचे महासंचालक गेरासिमोस थॉमस यांच्यादरम्यान या संदर्भात बैठक झाली. त्यानंतर या संदर्भातील करार करण्यात आला. या चर्चेत, भारताच्या कार्बन बाजारपेठेचा विकास, कार्बन मूल्य निर्धारण यंत्रणा आणि देखरेख, अहवाल आणि पडताळणी प्रणाली यांवर लक्ष केंद्रित करण्यात आलं.

**<u>सारस मेळा</u>**

ग्रामीण विकास मंत्रालयाच्या वतीनं विजयवाडा इथं आजपासून सारस मेळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते जत्रेचं उद्घाटन होणार आहे. 'सोसायटी फॉर एलिमिनेशन ऑफ रुरल पॉव्हर्टी' आणि आंध्र प्रदेश सरकार यांच्या सहकार्याने आयोजित केला जाणारा हा शहरातील पहिलाच राष्ट्रीय 'सारस मेळा' आहे. या मेळ्यात 30 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील स्वयं-सहायता गटांच्या 1500 हून अधिक महिला सहभागी होणार आहेत.

**<u>छत्तीसगड नक्षल</u>**

छत्तीसगडमधील सुकमा जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी लपवलेला शस्त्र आणि दारुगोळ्यांचा मोठा साठा सुरक्षा दलांनी हस्तगत केला आहे. या भागातील नक्षलविरोधी मोहिमेचे हे मोठे यश मानले जात आहे. आत्मसर्मपण केलेल्या नक्षलवाद्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, जिल्हा पोलिस दल, जिल्हा राखीव दल आणि बस्तर फायटर्सच्या संयुक्त पथकानं किस्ताराम पोलिस ठाण्याच्या हद्दीतील डोंगऱाळ आणि वनक्षेत्रात शोध मोहीम राबवून हा साठा ताब्यात घेतला आहे.

**<u>दहशतवादी</u>**

जम्मू-काश्मिरमध्ये नियंत्रण रेषेजवळ पूंछ जिल्ह्यात घुसखोरीच्या प्रयत्नात असलेल्या लष्कर ए तयब्बाच्या एका प्रमुख कमांडरसह चार दहशतवाद ठार झाले. भूसुरुंगाच्या स्फोटात हे चारही जण ठार झाले. मोहम्मद फैजान असं लष्कर ए तयब्बा च्या प्रमुखाचं नाव आहे.

**<u>डेन्मार्क बॅडमिंटन</u>**

डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत, एकेरी प्रकारात 32व्या फेरीच्या सामन्यात आज महिला आणि पुरुष गटाचे सामने होणार आहेत. महिला गटात आज पी. व्ही सिंधूचा सामना साऊथ कोरियाची खेळाडू अँन सी यंग हिच्याशी सामना होणार आहे. तर तन्वी शर्माचा सामना जपानची खेळाडू नाटसुकी निदैरा हिच्याशी होणार आहे. पुरुषांच्या एकेरीत लक्ष्य सेन आणि किंदम्बी श्रीकांत यांचेही सामने होणार आहेत.

**नेपाळ पूर**

नेपाळमध्ये आलेल्या पुरामुळे 100 हून अधिक परदेशी गिर्यारोहक विविध भागांमध्ये अडकले आहेत. काठमांडूजवळच्या गोरखा जिल्ह्यात पहाटेच्या सुमारास दरड कोसळल्यानं बुढी गंडकी नदीचा प्रवाह अडवला गेला, त्यामुळे नदीच्या खालच्या भागात पूरस्थिती निर्माण झाली; प्रशासनाने काल 12 परदेशी नागरिकांसह एकंदर 321 जणांची सुटका केली. आजही बचावकार्य सुरूच राहणार असल्याची माहिती सैन्यदलाने दिली आहे.

**हवामान**

हवामान विभागानं दिल्ली, हरियाणा, चंदीगड आणि पंजाबच्या काही भागांत विजांच्या कडकडाट, सोसाट्याच्या वाऱ्यांसह वादळी पावसाचा अंदाज वर्तवला आहे. तसंच ईशान्येकडील राज्ये, हिमाचल प्रदेश, केरळ, तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकल भागातही वादळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे तर कोकण आणि गोव्यात दिवसा उष्ण आणि दमट हवामान राहाण्याची शक्यता आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**